ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-II Feb. 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शिक्षक शिक्षणातील नवोपक्रमशिलता

## [विशेष शिक्षण]

**भोसले शकुंतला दगडू**
संशोधक विद्यार्थी
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
इ-मेल :ashub1983@gmail.com
मो.नं. : 9850473379

**प्रस्तावना :**

सामाजिक न्याय मिळविण्याचे प्रभावी साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षण हा मुलभूत हक्क असल्याची तरतुदही करण्यात आलेली आहे. शिक्षणामध्ये समावेशक शिक्षण ही अतिशय महत्वपूर्ण संकल्पना असून ती सर्वशिक्षा अभियान कार्यक्रमाचा एक भाग आहे. सामान्य विद्‌यार्थ्यांच्या वर्गात त्यांच्या बरोबरीने अध्ययनाची संधी अंध, अपंग, मतिमंद, मूकबधिर विद्‌यार्थ्यांना मिळावी या हेतूपुर्तीसाठी नव्यानेच सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना उद्‌यास आली.

**संकल्पना :**

1960 - बऱ्याच देशातून अस्तित्वात आली.

1981 - संकल्पनेस चालना, प्रसार.

1990 - जागतिक स्तरावर मांडली.

1994 - भारतासह 92 देश व 25 संघटनांनी ही संकल्पना मान्य केली.

1986 - च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही सर्वांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात अशी शिफारस केली आहे.

**व्याख्या :**

(1) "कोणताही भेदभाव न करता देशातील प्रत्येक बालकाला शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे म्हणजेच सर्वसमावेशक शिक्षण होय."

(2) सर्वांना सहभागी करुन घेणारे शिक्षण म्हणजे समावेशक शिक्षण.

(3) समावेशक शिक्षण म्हणजे विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा सर्वसामान्य शिक्षण योजनेत सहभाग होय.

**(4)** Inclusion thus has been defined as the acceptance of all pupils within mainstream education system thought within a common Frame work and identified as responsibility of all teachers (Thomes, 1991).

## ❖ समावेशक शिक्षणाची उद्दिष्टे :

1) समावेशक शिक्षणाचा अर्थ समजणे.

2) समावेशक शिक्षणात शाळेचे स्वरूप समजून घेणे.

3) 'विशिष्ठ गरजा' संकल्पना स्पष्ठ करणे.

4) दुर्बल, असमर्थ, अपंग यातील फरक समजून घेणे.

5) यासाठी असलेली सध्याची माहिती समजून घेणे.

6) सध्याच्या पद्धतीतील बदलांची माहिती घेणे.

7) समावेशक शिक्षणाची कार्यवाही समजून घेणे.

## ❖ समावेशक शिक्षणाची वैशिष्ठ्ये :

1) समावेशक शाळा सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश देते.

2) विशेष गरजा असणाऱ्यांचेही स्वागत केले जाते.

3) गरजू मुलेही शिक्षणापासून वंचित रहात नाहीत.

4) पालकांची भूमिका मित्रत्वाची असते.

5) शिक्षकांचे मुलांच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष असते.

6) सर्व प्रकारच्या मुलांना शिकविण्याचे कौशल्य शिक्षकात असते.

7) सर्व प्रकारच्या मुलांना शिकविण्याच्या सुविधा शाळेकडे असतात.

8) मुलांच्या क्षमतेनुसार शिक्षणाची उद्दिष्टे वेगवेगळी असतात.

9) सर्वसामान्य व अपंग मुले यांचा संबंध सारखा येतो.

10) कौशल्य विकसनासाठी शाळा मदत करते.

11) सामाजिक कार्याची माहिती शाळेत दिली जाते.

12) समस्या निराकरणासाठी सर्व शिक्षकांचा सहभाग असतो.

13) जास्त विद्यार्थी असले तरीही उपक्रमांमध्ये सर्वांना सहभाग घेता येतो.

❖ **समावेशक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गरजांचे स्वरूप गरजांचे स्वरूप पूर्णतः वैयक्तिक असते.**

**I) अपंगत्व प्रकरानुसार :**

1) अंध Blind.

2) कर्णबधिर Deaf.

3) मतिमंद Mental Retardation.

4) विकलांग Physically Handicap.

5) अध्ययन अक्षम Learning Disability.

6) मानसिक विकलांग Cerebral Palsy.

7) स्वमग्नता Ayatism.

**II) सामाजिक गरजा :**

1) सामाजिक आर्थिक दुर्बलता Socioeconomic Deprivation.

2) गरिबी Poverty.

3) नकारात्मक दृष्टीकोन.

4) धार्मिक अंधश्रद्धा.

5) अनिवार्य अभ्यासक्रम.

6) न समजणारी भाषा किंवा माध्यमे.

7) अप्तशिक्षित शिक्षण.

8) गबाळे शैक्षणिक प्रशासन.

9) अयोग्य वातावरण.

10) अपूर्ण शैक्षणिक धोरण.

विकलांगता कोणत्या स्थितीत आहे याची नेमकी माहिती मिळण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने खालील बाबी स्पष्ट केल्या आहेत.

1) **Disability :** Consequence of impairment of functional performance & activity of individual.

2) **Impairment :** Loss of anatomical structure.

3) **Handicap :** Impairment of disability limits.

### ❖ समावेशक शिक्षणात अध्यापनाचे तंत्र :

भारतीय शिक्षण पद्धतीत मोठ्या वर्गातील विद्यार्थी आपल्या मित्रांशी चर्चा करून समस्यांचे निराकरण करतो शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या समस्या दूर करण्याची तंत्र माहित असतात. सर्वसामान्य / स्पेशल शिक्षकांना तज्ज्ञ शिक्षकांच्या साहाय्याने प्रशिक्षण वदिले जाते. पालक व विद्यार्थी यांच्याशी चर्चा करून समस्या दूर केल्या जातात. प्रत्येक मुलाची गरज व त्याच्या अपंगत्वाची माहिती घेऊन त्याला त्याची प्रगती समजावून देणे यासाठी पालकांचे सहकार्य आवश्यक आहे.

समावेशक शिक्षणाच्या कार्यक्रमातुन तीन महत्त्वाच्या बाबी पुढे आल्या आहेत.

**1) मुलाचे हक्क :**

मुलांना शिक्षणाचा हक्क मिळून वयाच्या 18 व्या वर्षापर्यंत त्याच्या इच्छेप्रमाणे शिकण्याची संधी त्यांना मिळाली पाहजे.

**2) जबाबदारी :**

अशा मुलांना अध्ययनाच्या दृष्टीने योग्य वातावरण तयार करुन देणे. विद्यार्थी स्वतःच शिकू शकेल असे पाहणे.

**3) आदर :**

शिक्षकांनी विकलांग मुलांना आदराची वागणूक दिली पाहिजे. इतर विद्यार्थी अशा मुलांना मदत करतील असे वातावरण तयार करावे.

❖ **सर्वसमावेशक शिक्षणातील शिक्षकाची भूमिका :**

शिक्षक हा विद्यार्थ्यांना घडवितो. त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करतो. त्यामुळे अपंग विद्यार्थी आणि सामान्य विद्यार्थी या दोघांना एकत्रितपणें समावेशक शिक्षण देत असताना शिक्षकाला वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागत असतात. त्या पुढील प्रमाणे.

**(I) स्वतःच्या संदर्भातील बदलात पुढील भूमिकांचा समावेश होतो.**

- आजीवन अध्ययनार्थी.
- शिक्षणतज्ञ.
- संशोधक.
- व्यवस्थापक.
- साधन व्यक्ती.

**(II) इतरांच्या संदर्भात प्रत्यक्ष विद्यार्थी हा महत्त्वाचा घटक असल्याने त्या संदर्भातील बदलात पुढील भूमिकांचा समावेश होतो.**

- प्रशिक्षक.
- दिग्दर्शक.
- संप्रेषक.
- मार्गदर्शक.
- समुपदेशक.
- अध्ययन प्रेरक.
- अभ्यासक्रम साहित्य लेखक.

सर्वसमावेशक शिक्षणासाठी शिक्षकांची भूमिका ही अध्यापनापुरती मर्यादित नसून. अध्यापनाबरोबरच वरील सर्व भूमिका शिक्षकांना बजावण्याची आवश्यकता आहे. या भूमिका पेलवण्यासाठी चिकाटी, जिद्ध, कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि निष्ठा असणे महत्वपूर्ण ठरते.

## संदर्भ

1) डॉ. शेवतेकर शारदा व प्रा. निकुमे मदन. भारतीय शिक्षक-शिक्षण प्रणाली (प्रथमावृत्ती-जुलै-2011) विद्या प्रकाशन पुणे. पान नं. -135-138.

2) डॉ. भोसले रमा, श्री. भोसले संभाजी, श्रीमती इंगळे सीमा श्री. इनामदार इरफान, श्री.संकपाळ पांडुरंग. शिक्षक गुणवत्ता संवर्धन. (पहिली आवृत्ती - फेब्रु-2006) फडके पब्लिकेशन्स, कोल्हापूर. पान.नं.-115-119.

3) प्रा. आवचर सीमा. विशेष शिक्षण. (प्रथमावृत्ती नोव्हें. 2010) नित्य नुतन प्रकाशन, पुणे. पान.नं.-75-85.